# कलंक शोभा

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**कलंक शोभा : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ ३८०/-

# कलंक शोभा

# एक प्रात:काळ

## १

त्या दिवशी सकाळचे नऊ वाजून गेले तरी कॉलेजच्या वसतिगृहात जिकडे तिकडे सामसूम दिसत होती. बकेटांचे आवाज आणि न्हाताना उंच स्वरात मारलेल्या मुक्तकंठ ताना यावाचून स्नानगृहातल्या खोल्या सुन्या वाटत होत्या; या वेळची रोजची वर्दळ आणि गडबड क्लबात दिसत नसल्यामुळे त्या इमारतींनाही विलक्षण स्तब्धता प्राप्त झाली होती, आणि राहत्या खोल्यांपुढची नेहमीची या घटकेची धांदल, लगबग, हसणे, खिदळणे, पायांतल्या खडावा फरशीवर खडखडावणे, उजव्या बोटाभोवती किल्ल्यांची साखळी फिरविणे– या सगळ्यांचा आज अस्त झाल्यामुळे सूर्योदय झाला असूनही नित्याच्या उल्हासाची किरणे अजून तेथे प्रगट व्हावयाची आहेतसा भास होत होता.

काल कॉलेजचे वार्षिक संमेलन झाले होते, आणि रात्री साडेतीन चारपर्यंत जाग्रण झाल्यामुळे सारी विद्यार्थी मंडळी आज अजून शय्येतच मुरमुसून पडली होती.

शशिकान्ताने तर काल–काल कसले, आज पहाटे अंथरुणावर अंग टाकताना मनाशी ठरविले होते, की अकरा साडेअकरा वाजेपर्यंत झोप काढायची. साडेनऊ वाजून सूर्य पुष्कळच वर आल्यावर बंद खिडक्यांच्या फटीतून थोडासा प्रकाश त्याच्या डोळ्यांवर पडला तेव्हा त्याच्या गाढ झोपेचा जरा भंग झाला; पण तेवढ्याने झोपेचा नाद सोडण्याऐवजी शशिकान्त उताणा होता तो फक्त उजव्या कुशीवर वळला आणि

डाव्या हाताच्या कोपराचा खळगा डोक्यावर घट्ट बसवून निद्रेची आराधना त्याने पुन्हा सुरू केली. स्वत:च्या उघड्या दंडाचा स्पर्श त्याच्या मस्तकाला व मस्तकाचा स्पर्श त्याच्या बाहूला त्या क्षणी अतिशय सुखकारक वाटला. त्याचे ओठ त्या किंचित जागृतावस्थेतही जरा हसल्यासारखे विलगत झाले आणि आईने अंगाई करून निजवावे तद्वत् त्याची कल्पना त्याला सुखनिद्रा यावी म्हणून जी स्वप्ने त्याच्या मन:चक्षूंपुढे उभी करीत होती ती पाहता पाहता निद्रेच्या विस्मृतीचे पांघरूण तो अंगावर घेऊ लागला. त्याला जे सुखस्वप्न पडत होते ते त्याच्या यौवनाला व पराक्रमाला साजेसेच होते. निशा व आपण एका उद्यानाच्या पुष्पवाटिकेत हातात हात घालून जणू काही चालत आहोत व आकाशातल्या पूर्णचंद्राकडे बोट दाखवून ती आपल्याला काही विचारीत आहे–

च् ! पण तिचे शब्द त्याला काही केल्या नीटसे ऐकू येईनात !

तिने तोंड पुढे केले, तिच्या ओष्ठांचा व आपल्या कर्णाग्रांचा ओझरता स्पर्श घडला, अशीही सुखसंवेदना शशिकान्ताच्या हृदयात उठली– पण तिचे शब्द त्याने ऐकले नाहीत ते नाहीतच !–

त्याऐवजी–

खोलीच्या दारावर कोणी तरी जोराजोराने मारलेल्या थापा व 'शशी ! ए शशी! अरे शशीऽऽ !' अशा हाका त्याला वाढत्या स्पष्टतेने ऐकू आल्या.

आपण आतून ओ दिली नाही तर काही वेळाने हाका मारणारी व्यक्ती कंटाळेल असा विचार शशिकान्ताच्या मनात आल्यावाचून राहिला नाही; आणि या विचाराने ओ न देता आणि मिटलेले डोळेही न उघडता, लहान मुले जशी गोष्ट सांगणाऱ्या वडीलमाणसाला 'हं' म्हणून हुंकारतात तसे त्याने पुढचे स्वप्न दाखविण्याबद्दल आपल्या कल्पनेला हुंकारले. परंतु एक तर दारावरच्या थापा व हाका बंद होण्याऐवजी उलट अधिक जोरात सुरू झाल्या; आणि शिवाय चित्रपटाची पट्टी जागेवरून ढळून पडद्यावरची चित्रे नाहीशी व्हावीत तद्वत् त्याच्या अंत:चक्षूपुढची निशाही लुप्त झाली !–

त्याने डोळे उघडले व त्रासून विचारले,

''अरे कोण आहे?''

''शशी, अरे दहा वाजायला आले की ! काय कुंभकर्णाचा अवतार आहेस का काय तरी? ऊठ !''



''निजू रे बाबा ! Please !–''

''Please नाही अन् काही नाही ! मला आली आहे चहाची तलफ !–''

''मग जा की, ढोस एक सोडून दहा कप ! माझ्याभोवती का उगीच?–''

''तुझ्यावाचून चहा नाही गोड लागत मला ! शशी, ऊठ की रे ! वाटलं तर चहा पिऊन येऊन आपण दोघंही पुन्हा देऊ ताणून !–''

''छान !'' असे काहीसे उत्तरादाखल उद्‌गारताना 'तुझ्यावाचून चहा नाही गोड लागत मला !' हे त्या दुसऱ्या व्यक्तीचे शब्द शशिकान्ताच्या मनात घोटाळत होते. त्या शब्दांनी शशिकान्ताचे अंत:करण आनंदाने एकदम उचंबळले !

कारण बाहेरून हाका मारणारा मोहन व स्वत: शशिकान्त यांजमधील कित्येक वर्षांची गाढ प्रीती त्या लडिवाळ शब्दात व्यक्त झाली होती.

शशिकान्ताने उठून दार उघडले, व डोळे चोळीत व कपाळावरचे केसांचे झुपके मागे सारीत म्हटले,

''भारी मोहन तुझा त्रास–''

''असू दे.'' आत पाय टाकीत मोहन म्हणाला, ''आत्ता म्हाताऱ्या बेकर बाबाच्या दुकानात जाऊन चहा मारला की तूच शाबासकी देशील, बरं केलंस उठवलंस हे म्हणून !''

''म्हणजे? बेकरच्या दुकानात जाऊन चहा प्यायचा मनसुबा आहे वाटतं तुझा?'' केसांच्या झुपक्यात कपाळाकडून मागे सरकविलेली बोटे तशीच थांबवून शशिकान्ताने विस्मयाने विचारले, ''शाबास ! मला वाटलं, तू आपल्या खोलीत जय्यत तयारी ठेवली आहेस चहाची अन् मला बोलवायला आला आहेस !''

''छे रे ! मला आताशा स्वत: हातांनी चहा बनवायचा मनस्वी कंटाळा उत्पन्न झाला आहे. चांगलं बेकरचं दुकान अष्टौप्रहर सज्ज असताना उगीच का यातायात करीत बसावं आपण आपल्या खोलीत?''

ते मोहनचे बोलणे ऐकून शशिकान्ताने त्याच्याकडे चमत्कारिक नजरेने पाहिले व म्हटले,

''एकूण नुसत्या चहाचीच नव्हे, तर बेकरच्या दुकानात जायचीही तुला तल्लफ आली आहे म्हणेनास !''

मोहनची मुद्रा किंचित वरमल्यासारखी झाली; पण मुद्रेतला पालट चातुर्याने शक्यतो लपवून त्याने विचारले, ''म्हणजे?''

शशिकान्ताने उपरोधाने मान वेळावली, व म्हटले, ''काही नाही ! समजलो हां साहेब ! समजलो ! चहाच्या तलफेचं आपलं हे नाटक पुरं समजलं. तुला चहा नको आहे; बेकरची पोर, ती ल्यूसी, तिचं दर्शन तुला पाहिजे आहे ! दुसरं काही नाही !''

''काय वात्रट आहेस रे शशी !'' त्याला एक जोराचा ठोसा लगावण्याचा आविर्भाव करून मोहनने इन्कार केला, ''मला वाटतं माणूस आपल्यावरून जगाची पारख करू लागला की असले आरोप त्याला सुचतात !''

''अस्सं काय?'' असे म्हणून शशिकान्त मोठ्याने हसला, व मग त्याने झटकन टेबलावरचा पाण्याचा तांब्या उचलला, आणि चूळ भरण्यासाठी खिडकी उघडली.

मोहन कॉटवर बसला व क्षणभर शशिकान्ताकडे व खोलीतल्या वस्तूकडे पाहात राहिला. तसे पाहता पाहता अनेक विचार त्याच्या मनात येऊन गेले.

बेकरची तरुण देखणी मुलगी ल्यूसी हिच्याविषयीच्या आपल्या मनातील भावना शशिकान्ताने खरोखर ओळखल्या की काही तरी चेष्टा करावयाची म्हणून त्याने ल्यूसीचा उल्लेख केला, हे त्याला नीटसे ठरविता येईना. कॉलेजच्या आवारापासून पाच मिनिटांच्या अंतरावर पलीकडच्या बाजूस बेकरबाबाचे लहानसे इराणी थाटाचे फराळाचे दुकान होते. कॉलेजच्या तरुण विद्यार्थ्यांचा या दुकानास मनसोक्त आश्रय असे. मांसाहारातले प्राथमिक धडे याच दुकानात कॉलेजातली मंडळी एकमेकाला देत व गिरवित; आणि बेकरबाबा विलायती सूपशास्त्रात फारच प्रवीण असल्यामुळे मोठमोठी तज्ज्ञ मंडळीही विद्यार्थ्यांचे अतिथी म्हणून येऊन बेकरबाबाच्या 'टेबला'वर पंगत झोडून जात. बेकरबाबाचे दुकान म्हणजे कॉलेजच्या एकंदर 'लाइफ'चा मोठा महत्त्वाचा भाग समजला जाई. बेकरबाबांचे दुकान ही एक मोठी शिष्टमान्य संस्था झाली होती; व या कॉलेजचे जे विद्यार्थी पुढे उच्च शिक्षणासाठी विलायतेस जात ते तिकडे हिंदुस्थानातल्या आठवणी काढू लागले, की बेकरबाबाच्या दुकानाबद्दल बोलल्याखेरीज राहात नसत. आणि आज पंचवीस-तीस वर्षे अव्याहत लोकप्रियतेत वाढलेल्या बेकरच्या दुकानाला गेल्या दोन-तीन वर्षांपासून एक नवीनच अलंकार लाभला होता; आणि कॉलेजच्या तरुण मंडळींना खाद्यपेयांपेक्षाही त्याचे आकर्षण साहजिकपणेच अधिक वाटू लागले होते.

हा नवा अलंकार म्हणजे बेकरबाबाची चौथ्या कुटुंबापासून मोठ्या नवसा-सायासाने झालेली व त्यामुळे भारी लाडात वाढलेली एकुलती एक देखणी मुलगी ल्यूसी. पंधरा-वीस वर्षांपूर्वी जी तरुण पिढी कॉलेजात शिकून गेली त्यांना ल्यूसी



म्हणजे गरम शालीत सदा गुंडाळलेली, काळी-सावळी पण भारी बाळशाची, मांसल मुठीत खुळखुळा गच्च धरून हालवणारी व अकारण हसणारी, बेकरबाबाची तान्ही मुलगी येवढीच आठवण असेल. परंतु आजच्या विद्यार्थ्यांना ती ल्यूसी फक्त बेकरबाबा कधी कधी एक जुना फोटो कौतुकाने दाखवी त्यातच अस्पष्टशी पाहावयास सापडे. प्रत्यक्ष त्यांच्या दृष्टीपुढे ल्यूसी वावरे ती ऐन नवयौवनात शिरणारी, आपले लांबसडक केस नाना तऱ्हेने बांधणारी, टपोऱ्या डोळ्यांचे बाण चहूकडे सोडणारी, श्यामल वर्णाची मुलगी होती ! या ल्यूसीविषयी विद्यार्थ्यांमध्ये नाना तऱ्हेच्या गप्पा चालत, व तिचा विषय काढून एकमेकांच्या चेष्टा करणे हा विद्यार्थिमंडळीतला ठराविक विनोदप्रकार असे.

म्हणून शशिकान्तने ल्यूसीचा उल्लेख करून जी चेष्टा केली त्यामुळे आपल्या हृद्गताचा अदमास त्याने केला की काय, अशा शंकेने मोहन चपापला खराच पण मग कॉटवर बसल्यानंतर त्याला असेही वाटले की, शशिकान्ताच्या त्या बोलण्यात कॉलेजात रूढ झालेल्या विनोदापलीकडे काही तथ्य नसावे.-

तसे वाटले, पण ते वाटणे त्याच्या मनात ठरेना ! म्हणून जेव्हा असे असेल की तसे असेल अशा शंकेत असतो, तेव्हा जे नसावे अशी त्याची इच्छा असते तेच असल्याची शंका त्याच्या मनात अधिक प्रबळ ठरते. मोहनचे असेच झाले.

शशीने आपल्या मनातल्या ल्यूसीविषयीचा भाव ओळखला की काय, ही शंका त्याला दूर लोटता येईना आणि या शंकेने तो वाजवीपेक्षा अधिक अस्वस्थ झाला, याचे कारण असे होते, की शशीला आपला हा प्रणयप्रकार मुळीच रुचणार नाही व त्याबद्दल तो कदाचित आपली कानउघाडणी देखील करील अशी त्याला भीती वाटत होती. शशीने अशी आपली कानउघाडणी करावी असेच आपले हे वर्तन नाही काय? - आणि आपला तोल कोठे जात असेल तर त्याबद्दल प्रेमाने-आणि वेळ आली तर कठोर शब्दांनीही आपल्याला इशारा देऊन सावरण्याचा अधिकार सर्वांत अधिक शशीलाच नाही काय?-

असे काही प्रश्न मोहन आपल्या मनाला विचारीत होता, इतक्यात शशीने खिडकीतून बाहेर काढलेली मान आत घेतली, व रिकामा तांब्या खिडकीच्या कंगोऱ्यावर टेकून कॉटच्या कठड्यावर असलेला टर्किश टॉवेल घ्यावयासाठी तो मोहनजवळ आला.

त्याने तोंड पुसले व केस विंचरण्यासाठी टेबलाच्या खणातील ब्रश व कंगवा काढावा म्हणून त्याने तो खण खसकन ओढला.

त्याबरोबर दहा बारा चकचकीत सोन्या-चांदीची पदके हिंदकळून खणातून उडाली व खणखण करीत खाली फरशीवर घरंगळली.

शशिकान्ताने ती सावरली नाहीत किंवा उचललीही नाहीत. इतकेच नव्हे, तर त्याने त्यांजकडे पाहिले देखील नाही ! आरशात पाहण्यासाठी तो भिंतीजवळ सरकला, आणि आपले लांब, काळेभोर, मऊ केस ब्रशाने भराभर वळवू लागला.

केस विंचरणाऱ्या त्या शशीकडे आणि खाली फरशीवर पडलेल्या त्या पदकाकडे पाहून मोहनच्या मनात आले,

''अगदी बरोबर शशी ! येवढ्या एका प्रसंगावरून शशी ओळखावा !''

मोहनच्या मनात हे आले ते उगीच नव्हे.

परसातली भाजी खुडावी तशी पदके मिळवीत जाणारा व ती मिळविल्यावर त्यांचे आस्थापूर्वक जतन अगर प्रदर्शन न करता वागणारा शशिकान्त म्हणजे यौवनसुलभ पराक्रमाचा आणि यौवनात दुर्लभ असणाऱ्या निरभिमान वृत्तीचा एक स्पृहणीय नमुना होता. मोहन व शशिकान्त चार वर्षांपूर्वी कॉलेजात आले तेव्हापासून शशिकान्तच्या ज्या आठवणी मोहनच्या मनात होत्या त्या साऱ्या त्याच्या वाढत्या लोकप्रियतेच्या. कॉलेजच्या शिक्षणक्रमातील पहिल्या वर्षापासूनच क्रिकेट, टेनिस, हॉकी, फुटबॉल इत्यादी सर्व क्रीडांतील आपल्या असामान्य नैपुण्याने शशिकान्ताने आपले नाव सर्वतोमुखी करून टाकले. मोहनला नेहमी मनातल्या मनात आश्चर्य वाटे की आपण स्वत: वर्षभर नियमितपणे अभ्यास करतो, आणि खेळण्यात फारसे मन गुंतू देत नाही तेव्हा कोठे चांगला 'सेकंड क्लास' आपल्याला प्रत्येक परीक्षेत मिळविता येतो; आणि हा शशी सारे खेळ खेळतो, एवढेच नव्हे, तर त्यात अग्रस्थानाचा मान संपादन करतो, कित्येक वेळा लहर आली, की जलरंगाची किंवा तैलरंगाची चित्रेही काढण्यात दिवसच्या दिवस घालवितो व त्या चित्रांबद्दल तज्ज्ञांकडून थोडी फार वाहवाही मिळवितो, आणि इतके करून पुन्हा प्रत्येक परीक्षेत हा पास होत जातो- हे याला साधते तरी कसे?

हे कोडे मोहनला एकट्यालाच पडले होते असे नव्हे; कॉलेजात सगळ्यांनाच ते पडले होते. शशिकान्ताकडे पाहताच कोणाच्याही मनात हेच येई की या तरुणाने



अनेकविध गुणांचे संपादन करूनही आपला अभ्यास संभाळला आहे हे कसे? मोहन व शशिकान्त हे दोघेही नागपूरचे आणि मोहन हा पूर्वी एके काळी फार संपन्न, परंतु आता डबघाईस आलेल्या तांबे आडनावाच्या कुटुंबातला एकुलता एक मुलगा असून शशिकान्त हा त्या कुटुंबात आश्रित अनाथ मुलगा म्हणून समवयस्क मोहनबरोबर लहानपणापासून वाढला, ही गोष्ट कॉलेजात बहुतेक सर्वांस माहीत होती आणि त्यामुळे एकदा कॉलेजातला शिक्षणक्रम संपवून पायावर उभे राहण्याच्या ईर्ष्येने शशिकान्त अभ्यासाविषयी दक्षता ठेवीत असावा हेही सर्वांना समजत होते. परंतु साऱ्यांना विस्मय वाटे तो या गोष्टीचा, की आपल्या आवडीचे सारे नाद संभाळून शशिकान्त अभ्यास करतो तरी केव्हा? कॉलेजची क्रिकेटची मॅच असो अगर हॉकीची मॅच असो, कॉलेजची सारी मदार शशिकान्तावर असायची. टेनिस खेळायला कोणी बाहेरचे निष्णात खेळाडू आले तरी त्यांचेही अजिंक्यपात्र हिसकावून घेण्यासाठी कॉलेजने पुढे कोणाला करायचे तर शशिकान्तालाच. उंच उडी, लांब उडी, धावणे वगैरे कॉलेजच्या वार्षिक शर्यती व्हायच्या त्यातही शेवटी बक्षिसांच्या यादीत बहुतेक सदरात नंबर एकच्या जागी नाव यायचे शशिकान्तचेच, आणि वार्षिक संमेलनात नाटक व्हायचे त्यातही मुख्य पुरुष भूमिका करण्याची आणि सर्वांना तालीम देऊन प्रयोग बसविण्याची जबाबदारी सगळ्यांनी खुषीने व एकमताने नेहमी टाकायची ती शशिकान्तावरच ! आणि या क्रीडानैपुण्याच्या, कलासक्तीच्या आणि रसिकतेच्या जोडीला शशिकान्ताची अभ्यासाविषयीची दक्षता दिसत असल्यामुळे शशिकान्त म्हणजे सगळ्यांना कॉलेजचे एक मोठे भूषण वाटे. त्याच्या उंचनिंच, बांधेसूद, जरा किरकोळशाच आकृतीकडे आणि काळ्यासावळ्या लांबटशा, प्रसन्न पण पाणीदार चेहऱ्याकडे पाहताच कॉलेजातल्या साऱ्या विद्यार्थ्यांना अमर्याद प्रेम आणि कौतुक वाटते.

या कौतुकानेच मोहन या क्षणी शशिकान्ताकडे पाहात राहिला होता.

केस विंचरणे झाल्यावर जेव्हा शशिकान्ताने ब्रश व कंगवा खणात टाकून खण परत लोटून बंद केला तेव्हा मोहनने म्हटले,

''अरे, ती मेडल्स उचलून खणात तरी ठेव गृहस्था !''

''उं ! ठेवीन मग सावकाश !'' असे म्हणून शशिकान्ताने टेबलावरची कात्री उचलून एक नख कातरल्यासारखे केले.